"Dissemination of Education for Knowledge, Science and Culture"
-Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe



KOLHAPUR
NAAC Accredited "A"
in 3rd cycle
With CGPA - 3.24
58th Rank in NIRF - 2017

# Vivekanand College, Kolhapur

## Dept. of History & Political Science

# PROCEEDINGS

## One day International Multidisciplinary Seminar

## "Emerging Movements & Trends in Humanities and Sciences"

22 nd September, 2017

A Special issue of

## Aayushi International Interdisciplinary Research Journal

Special Issue- XV ISSN -2349-638x
Impact Factor 3.025

Dr. S. R. Kattimani
Editor

Dr.M.S. Ghrorpade
Co-Editor

Mr.D. A. Pawar
Co-Editor

Dr. S. Y. Hongekar
Principal,
Vivekanand College, Kolhapur

"Dissemination of Education for Knowledge, Science and Culture"
-Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe



कोल्हापूर
NAAC accredited "A"
in 3rd cycle
With CGPA - 3.24
58th Rank in NIRF -2017

# Vivekanand College, Kolhapur

Dept. of History & Political Science

**PROCEEDINGS**

One day International Seminar on

# "Emerging Movements & Trends in Humanities and Sciences"

**22nd September, 2017**

**A Special issue of**

**Aayushi International Interdisciplinary Research Journal**

**Special Issue- XV ISSN –2349-638x**

Dr. S. R. Kattimani
**Editor**

Dr. Manjushri Ghrorpade
**Co-Editor**

Prof. D. A. Pawar
**Co-Editor**

Dr. S. Y. Hongekar
Principal, Vivekanand College, Kolhapur

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 43. | प्रा.डी. ए. पवार, | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची वैचारीक चळवळ (इ.स. १९०९ ते १९६८) | 163 To 165 |
| 44. | प्रा. संजय के. पाटील | कॉ.श्रीपाद डांगेचे कामगार चळवळीतील आर्थिक विचार | 166 To 169 |
| 45. | डॉ.सौ.सुगंधा हिंदूराव घरपणकर | भूमंडलीकरण के परिप्रेक्ष्य में नारी | 170 To 171 |
| 46. | कुबेर दिनकर दिंडे | महिला सबलीकरणात स्वयं सहाय्यता बचत गटांचे योगदान | 172 To 176 |
| 47. | वाय.डी. हरताळे | भारतातील सहकारी चळवळ | 177 To 180 |
| 48. | नंदा संजय नायकवडी | क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी | 181 To 184 |
| 49. | शरद विठ्ठल पाटील | कामगार चळवळीची उपयुक्तता | 185 To 187 |
| 50. | डॉ.तानाजी रामचंद्र हवलदार | सातारचे प्रतिसरकार व क्रांतीवीर बर्डे गुरूजी | 188 To 190 |
| 51. | डॉ.मंजूश्री शिवाजीराव घोरपडे | १९ व्या शतकातील स्त्री बंधमुक्ती चळवळ | 191 To 193 |
| 52. | डॉ.सुजाता सा.पाटील | १८ व्या १९ व्या शतकातील भारतातील स्त्री मुक्ती चळवळ - एक दृष्टीक्षेप | 194 To 197 |

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची वैचारीक चळवळ (इ.स. १९०९ ते १९६८)

प्रा. डी. ए. पवार,
सहाय्यक प्राध्यापक,
राज्यशास्त्र विभाग,
विवेकानंद कॉलेज,कोल्हापूर.

२० व्या शतकात गाडगे महाराजांनंतर दुसरा महान कर्मयोगी म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज होय.नागपुर विद्यापीठास त्याचे नाव दिले आहे.भारताचे राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांना तुकडोजी महाराजांना राष्ट्रसंत ही उपाधी दिली होती.त्यांचे मुळ नाव माणिक बंडोजी ठाकुर असे होते.पंढरपुरचा विठोबा हे त्यांचे कुलदैवत असल्यानं त्यांच्यावर भजन, किर्तन, पुजा अर्चा इ. संस्कार झाले.तुकडोजी महाराजांना अडकुजी महाराज भेटले त्यांना आपले गुरु मानले.

**पुर्व वृत्तांत :**

१० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्हयातील यावली या गावात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्म झाला.त्यांचे शिक्षण चौथी पर्यंत झाले. शाळेत असतानाच त्यांना भजन, किर्तनाचे वेड होते.वरखेडला समर्थ अडकुजी महाराजांच्या किर्तनाला ते डफळी वाजवु लागले.अभंग, किर्तन म्हणणे, खंजीर वाजविणे तुकडोजी महाराजांना आवडत असे.तुकडोजी महाराजांनी आपल्या रसाळ वाणीने संपूर्ण भारत देशाला भुरळ घातली. ते देशभक्तीलाच ईश्वरभक्ती मानत आणि देशाच्या स्वातंत्र्याला मोक्ष मानत असत. म.गांधी १६ जुलै १९३६ पासुन वर्ध्यास राहावयास गेले तेव्हा गांधीजी व तुकडोजी महाराज एक महिना सोबत राहिले. तेव्हापासुन त्यांनी देशभक्तीला स्वत:स अर्पण केले.१९३६ ते १९४२ या काळात तुकडोजी महाराजांनी लोकजागृती,धर्मजागृती,लोकसंघटन या कामी स्वत:ला वाहुन घेतले. जनतेला स्वातंत्र्यलढयात सामील व्हा असा संदेश ते आपल्या अभंगातुन किर्तनातुन देत होते. १९४२ मध्ये चंद्रपुर मध्ये आष्टी येथे जो लढा झाला.त्या लढयास तुकडोजी महाराजांनी प्रेरणा दिली होती. म्हणुन त्यांना अटक झाली होती.स्वातंत्र्य मिळेपर्यंत त्यांना वर्धा, चंद्रपुर मध्ये प्रवेश बंदी होती.

**श्री गुरुदेव सेवा मंडळाची स्थापना :**

११ नोव्हेंबर १९४३ रोजी तुकडोजी महाराजांनी श्री गुरुदेव सेवा मंडळाची स्थापना केली. या मंडळाची उद्दीष्टये समाजामध्ये एकी निर्माण करणे.राष्ट्रभक्ती वाढीस लावणे. मानवाची सेवा करणे इ. होती. सेवा मंडळाचा वृक्ष सतत वाढत गेला.आपल्या सद्कर्मांची फुले ईश्वराला अर्पण करावीत असे ते म्हणत असत.ते अस्पृश्यता, जातीभेद पाळु नका,दारु पिऊ नका इ. संदेश या गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातुन दिला. तसेच स्वातंत्र्यानंतर भारताची फाळणी झाली. यातुनच पाकिस्तानची निर्मिती झाली. यामुळे भारतात हिंदु मुस्लीम दंगली सुरु झाल्या.तेव्हा हिंदु मुस्लीमांनी आपापसात संघर्ष करु नये असे आवाहन त्यांनी केले.जगातील कोणताही धर्म हा दुस-या धर्मावर हल्ला करण्यास सांगत नाही.त्यामुळे सर्व धर्मियांनी बंधुभावाने एकत्र राहावे असे तुकडोजी महाराज यांनी सांगितले.

**ग्राम गीता :**

१९५३ च्या आषाढी एकादशीस चंद्रभागेच्या वाळवंटात तुकडोजी महाराजांना ग्रामगीता लिहण्याची स्पुर्ती मिळाली.ग्राम गीतेत त्यांनी जीवनाचे तत्वज्ञान मांडले आहे. ग्रामगीतेतुन तुकडोजी महाराजांनी समाजातील सर्व घटकांना संदेश दिला आहे.परमेश्वराला माणुस द्या, मज माणुस द्या अशी

भीक ते मागतात.तसेच सर्वांवर प्रेम करा.माणसाने नेहमी चांगले काम करावे.चांगले विचार मनात आणावेत. तसेच माणसाने नेहमी उद्योगी असावे.उद्योग शिलतेमुळेच ऐश्वर्य येते असे ते म्हणत तसेच दुर्गुण,व्यसन यांना आपल्या पासुन दुर ठेवा.पाश्चात्य शिक्षण घेण्याऐवजी जीवन आवश्यक शिक्षण घ्या.अस्पृश्यता, हुंडा प्रथा याला विरोध करा.तसेच राष्ट्राचा विकास करण्यासाठी तरुणांना खेडयांकडे चला असे संदेश आपल्या ग्राम गीता ग्रंथातुन दिला.

**स्वातंत्र्य चळवळ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज :**

तुकडोजी महाराज फक्त संत नव्हते तर ते राष्ट्रसंत ही होते. ते विविध कार्यक्रमातुन राष्ट्रगीतांची पेरणी करत.जात, धर्म यांच्या पलिकडे जाऊन ते देशाचा प्रथम विचार करीत असत.आर.एस.एस. च्या स्वयंसेवकापुढे त्यांचे भाषण होत असत.तसेच हिंदु महासभेच्या कार्यक्रमांना ते उपस्थित असत त्याच्या भजनामधुन,किर्तनामधुन राष्ट्रभक्ती विषयी प्रेरणा देत असत.१९४२ मध्ये आष्टी चिमुर मध्ये जो लढा झाला त्या लढयास त्यांची प्रेरणा होती.

**शिपिंझु धर्म परिषद :**

२३ जुलै १९५५ रोजी जपान मध्ये भरलेल्या विश्वधर्म परिषदेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची निवड झाली. या धर्मपरिषदे मध्ये त्यांनी भारताचे प्रतिनिधी म्हणुन हिंदु धर्माविषयी भाषण केले.

**स्वदेशीची पुरस्कार :**

ब्रिटीश राजवटी विरुध्द त्यांनी स्वदेशी वस्तुचा पुरस्कार केला. स्वदेशीचा पुरस्कार करुन राष्ट्रभक्ती वाढीस लावली.चहा कॉफी, परदेशी कापड या परकीय वस्तुवर बहिष्कार टाकावा.त्याच्या ऐवजी स्वदेशी वस्तुंचा वापर करावा असे त्यांनी आपल्या ग्रामगीता ग्रंथात सांगितले.तसेच स्वदेशी उद्योगधंदे यामध्ये वाढ करावी.स्वदेशीचा वापर करुन गावचे धन हे गावातच राहावे असे त्यांनी सांगितले.

**भुदान चळवळीस राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे सहकार्य :**

विनोबा भावे यांनी १९५१ पासुन भुदान चळवळ सुरु केली.भुदान चळवळीस सहकार्य करण्याच्या भुमिकेतुन १ मे १९५३ रोजी यवतमाळ जिल्हयातील पारवा या गावापासुन सुरुवात केली. केवळ १० दिवसामध्ये ११४१० एकर जमिन भुमिदानास मिळवुन दिली. याकामी आबासाहेब पारवेकर यांनी तुकडोजी महाराज यांना मदत केली.

**गोवध बंदी कायदासाठी आग्रह :**

गोवध बंदीचा कायदा करावा अशी विनंती त्यांनी घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याकडे केली गाय ही देशाची संपत्ती आहे.प्राण्यांची हत्या करणे हा धर्ममार्ग नसुन राक्षसी भक्तीची रीत आहे असे महाराज म्हणत.आपल्या भजन, किर्तनातुन बळी देण्याची प्रथा बंद करा असे त्यांनी सांगितले.

**अस्पृश्यांसाठी मंदीरे खुली केली :**

देवावर, देवळावर कोणा एका विशिष्ट जातीचा हक्क नाही अशी त्यांची भुमिका होती. पंढरपुरचे विठोबाचे मंदीर अस्पृश्यांना खुले व्हावे यासाठी साने गुरुजींनी आमरण उपोषण सुरु केले. तेव्हा त्यास तुकडोजी महाराजांनी पाठींबा दिला.केवळ १ महिन्यात तुकडोजींनी विदर्भातील ५२ मंदिरे अस्पृश्यांसाठी खुली केली.मंदीरे अस्पृश्यासाठी खुली झाली पाहिजेत.असा आग्रह त्यांनी ठरला. १९४५ मध्ये वरखेड येथे संत समेंलन भरले होते.तेव्हा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी साधु संताना राष्ट्र कार्याकडे वळावे असे आवाहन केले.तसेच त्यांनी कृष्ठरोगी यांना आपलेच मानले होते.

**स्त्री उध्दाराचे कार्य :**

स्त्री ही अबला, दुर्बल नसुन ती एक शक्ती आहे असे तुकडोजी महाराज म्हणत.स्त्रियांनीच महापुरुष,थोरसंत,लढवय्ये पुरषांना जन्म दिला.यामुळे समाजामध्ये स्त्रीयांना समाज दर्जा असावा.तसेच त्यांना शिक्षण घेण्याचा हक्क असावा असे त्यांनी सांगितले.विषम समाज रचना, जातीय कलह, वर्गकलह, धर्मकलह हे गावाच्या अध:पतनाचे, नैतीक –हासाचे कारण होय असे ते म्हणत.

**योग्यता :**

अमरावती जिल्हयातील मोझरी या गावी ११ ऑक्टोबर १९६८ मध्ये त्यांचे निधन झाले. प्रत्येक व्यक्तीने ईश्वर भक्तीपासुन आत्मोध्दार करावा.समाजातील दीन दुबळयांचे कल्याण करावे हीच त्यांची प्रमुख शिकवण होती.भारताचे राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांनी तुकडोजी महाराजांना राष्ट्रसंत ही उपाधी दिली.

**संदर्भ:**

१) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर दूर शिक्षण केंद्र महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास २००८ .
२) महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, प्रा. व्ही. बी. पाटील के. सागर प्रकाशन पुणे २००४.
३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय–२००६